## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ८ प्रतिनिधी (      ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात इंद्रधनुष्य युवक महोत्सवाच्या चौथ्या दिवशी विविध कला प्रकारातील भारतीय कला संस्कृतीचे विविध पैलू सादर करून विद्यार्थी कलावंतानी उपस्थितांची दाद मिळवली. दरम्यान उद्या दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा समारोप होणार आहे. समारोपाला प्रसिध्द मराठी पार्श्वगायक आदर्श शिंदे यांच्या उपस्थितीचे आकर्षण ठरणार आहे.

इंद्रधनुष्य महोत्सवाच्या चौथ्या दिवशी **रंगमंच क्रमांक १** राष्ट्रकवी बंकिमचंद्र चटोपाध्याय सभागृहात भारतीय शास्त्रीय नृत्य या कलाप्रकारात शास्त्रीय नृत्याचे मनोहारी सादरीकरण रंगले. भरतनाट्य, कथ्थक आणि ओडीसी अशा विविध नृत्य प्रकारातील उमटलेली ताल, लय आणि भावनांच्या अभिव्यक्तीमुळे उपस्थित मंत्रमुग्ध झाले होते. यात एकूण १६ सघांनी सहभाग घेतला. तर दुपारच्या सत्रात भारतीय लोकसमुह नृत्याने सभागृहात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. सभागृहातील उपस्थितांनी सादर झालेल्या लोकसमूह नृत्यावर अक्षरशा ठेका धरला. यात एकूण २२ सघांनी सहभाग घेतला.

**रंगमंच क्र. २** स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात भारतीय शास्त्रीय गायन या कला प्रकारात कलावंतानी राग, रचना, भैरवी, एकताल, त्रीताल सादर करून सभागृहातील उपस्थितांची दाद मिळवली. यात एकूण १६ सघांनी सहभाग नोंदविला. दुपारच्या सत्रात भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वर वाद्य) या कलाप्रकारात वाद्यांच्या सुरांनी सभागृहात सुरेल वातावरण निर्माण केले होते. यात एकूण २२ सघांनी सहभाग नोंदविला.

**रंगमंच क्रमांक ३** भगवान बिरसा मुंडा सभागृहात प्रहसन आणि नक्कल या कला प्रकारांनी उपस्थितांना हास्याची मेजवानी दिली. विद्यार्थ्यांनी समाजातील वास्तव आणि विसंगतीवर हलक्या फुलक्या शैलीत भाष्य करत मनोरंजनासह सामाजिकतेचा संदेश दिला. प्रहसन या प्रकारात २० तर नक्कल या प्रकारात १७ सघांनी सहभाग नोंदविला.

**रंगमंच क्रमांक ५** बाल हुतात्मा शिरीष कुमार सभागृहात झालेल्या स्थळचित्रण आणि इन्स्टालेशन या कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर कलात्मक अभिव्यक्ती साकारली. यात एकूण २१ सघांनी सहभाग नोंदविला.

**रविवारी बक्षीस वितरण :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु असलेल्या इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण समारंभदि. ९रोजी सकाळी ११ वाजता रंगमंच क्रमांक १ बंकिमचंद्र चटोपाध्याय सभागृहात होणार आहे. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी राहतील तर प्रमुख अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रविंद्र कुळकर्णी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते, जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी रोहन घुगे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिध्द मराठी पार्श्वगायक आदर्श शिंदे, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे उपस्थित राहणार आहेत. दि. ५ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत झालेल्या विविध कलाप्रकारातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विनोद पाटील व विद्यापीठ विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ८ प्रतिनिधी (      ) : वंदे मातरम गीताच्या १५० व्या वर्धापन दिना निमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दि.७ नोव्हेंबर रोजी सायं. ७ वाजता देशभक्तीपर विविध नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा. मनीष जोशी, कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, राज्यपाल नियुक्त व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्य.प. सदस्य शिवाजी पाटील, नितीन झाल्टे, प्रा. जगदीश पाटील, प्रा. पवित्रा पाटील, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, राजभवन निरीक्षण समितीचे अध्यक्ष संदीप हांडोळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे उपस्थित होते.

यावेळी प्रभाकर कला अकादमी, कलादर्पण फाउंडेशन, मुद्रा भरत नाट्यम स्कूल ऑफ आर्ट व विवेकानंद प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विविध नृत्ये सादर केली. तसेच विवेकानंद प्रतिष्ठानच्या संगीत विभागाने देशभक्तीपर गायन तसेच वंदे मातरम गीताचे सामूहिक गायन केले. यावेळी अधिसभा सदस्य नेहा जोशी, स्वप्नाली महाजन,मिनाक्षी निकम, वैशाली वराडे, धीरज वैष्णव, संजय हांडे, डॉ. महिमा मिश्रा, डॉ. अपर्णा भट उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय सुबळे यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ८ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता